महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२- २२०२५०८८ ई-मेल- hdo२.home@maharashtra.gov.in

---

**क्रमांक:** गृहआ-१०२३/प्र.क्र.२६७/आस्था-२ **दिनांक:** ३० ऑगस्ट, २०२३.

प्रति,

वरिष्ठ सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क संचालनालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषयः- शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त लघुलेखकांची सेवा करार पध्दतीने घेण्याबाबत.

महोदय,

या विभागात विवक्षित कामासाठी शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याच्या अनुषंगाने वृत्तपत्रात तसेच शासनाच्या www.mahanews.gov.in या संकेतस्थळावरही नोकरी या सदरात प्रसिध्द करावयाची जाहिरात सोबत जोडली आहे. तरी सदर जाहिरात दोन सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात तसेच शासनाच्या www.mahanews.gov.in या संकेतस्थळावरील नोकरी या सदरात प्रसिध्द करण्यांत यावी, ही विनंती.

आपला,

(संदिप ढाकणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) निवड नस्ती.



C:\Users\mahesh.pathak9\Desktop\parab\सन २०२३\सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेणे\करार पध्दतीने भरणेबाबत श्री. कय्युम मुल्ला व.स्वीय.स..doc

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याकरिता अर्ज मागविण्यांत येत आहेत:-

| अ.क्र. | विवक्षित कामाचे स्वरूप | आवश्यक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी | वय, अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विभागातील काम हे मुख्यत: कायदा व सुव्यवस्था व राज्य पोलीस दलाशी संबंधीत असून पोलीस दलाचे प्राप्त प्रस्ताव तसेच इतर अनुषंगिक कामे हाताळणे. | वरिष्ठ स्वीय सहायक | ३ वर्षे अनुभव<br>वयोमर्यादा कमाल ६५ वर्षापर्यंत | ०१ |

# अर्जाचा नमुना

गृह विभाग, मंत्रालय, मुंबई येथे राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव:-

२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता:-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम:-

४. भ्रमणध्वनी क्रमांक:-

५. जन्म दिनांक व वय:-

६. शैक्षणिक अर्हता:-

७. अनुभव:-

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सादर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी

## नियुक्तीच्या अटी व शर्ती:-

१) सदर नियुक्त्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ मधील तरतूदीनुसार करण्यांत येतील. तसेच सदर शासन निर्णयानुसार आर्थिक लाभ देण्यांत येतील.

२) सदर नियुक्त्या केवळ ११ महिन्यांच्या कालावधीकरिता अथवा शासनाकडून नियमित अधिकारी/कर्मचाऱ्याची नियुक्ती यापैकी जे आगोदर घडेल तेवढया कालावधीकरिता असेल.

३) इच्छुक सेवानिवृत्त कमचाऱ्यांने त्यांचे अर्ज हे - hdo२.home@maharashtra.gov.in ई मेल आयडी वर, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत सादर करावेत. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्जांवर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

४) मुंबई शहर व उपनगर क्षेत्रातील अर्जदाराने कृपया करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज करावा.

५) मुलाखतीव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

६) करार कालावधीत सेवानिवृत्ती अधिकारी/कर्मचारी गृह विभाग, मंत्रालय. मुंबई यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

**संपर्क:- सह सचिव, (आस्थापना), गृह विभाग, २ रा मजला (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.**
**दूरध्वनी क्र. ०२२ २२०२५०८८**


C:\Users\mahesh.pathak१\Desktop\parab\सन २०२३\सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेणे\करार पध्दतीन भरणेबाबत श्री. कय्युम मुल्ला प.स्वीय.स..doc